(A High Impact Factor, Quarterly, Peer Reviewed, Referred & Indexed Journal)

NAVJYOT / Vol. XI / Issue – I ISSN 2277-8063

# छ. शाहू महाराज आणि वेदोक्त प्रकरण

**प्रा. डॉ. संजय सागरू सपकाळ** राज्यशास्त्र विभाग, श्रीमंत बाबासाहेब देशमुख महाविद्यालय, आटपाडी,

मेल: sanjaysapkal71@gmail.com

---

**प्रस्तावना**

महाराष्ट्रीतील ब्राह्मणेतर चळवळीचा पाठीराखा म्हणून छ. शाहू महाराजांकडे पाहिले जाते. या चळवळीच्या प्रकटीकरणाच्या वेळी तिचे स्वरूप ब्राम्हणेत्तरांच्या राजकीय हक्कांच्या मागणीसाठी सुरु केलेली चळवळ असे भासत असले तरी तिची बीजे महात्मा फुलेंच्या सत्यशोधक चळवळीत व शाहू महाराजांच्या वेदोक्त चळवळीत पेरली गेली होती. ब्राह्मणशाहीच्या सर्वंकष जुलमी सत्तेविरुद्ध संघर्ष करणारी सत्यशोधकांची चळवळ ही महाराष्ट्रातील ब्राह्मणेत्तरांची पहिली चळवळ होती, तर शाहू महाराजांनी सुरु केलेली वेदोक्ताची चळवळ ही ब्राह्मणशाहीच्या मक्तेदारी विरुद्ध व अन्याया विरुद्ध सुरु केलेली ब्राह्मणेत्तरांची दुसरी चळवळ होती. शाहू महाराज यांच्या वेदोक्त चळवळीबरोबर महात्मा फुलेंच्या सत्यशोधक चळवळीचे पुनरुज्जीवन करून ब्राह्मणेत्तर चळवळीची पार्श्वभूमी तयार झाली.

छत्रपती शाहू महाराज यांनी वेदोक्त की पुराणोक्त या वादात आपल्या क्षत्रिय वर्णाचा अभिमान बाळगून वर्ण व्यवस्थेने दिलेले वेदोक्ताचे अधिकार पुन्हा मिळवण्यासाठी ब्राम्हणांच्या धार्मिक मक्तेदारीला आवाहन देऊन जातीभेद व वर्णभेद नष्ट करण्यासाठी लढा दिला. वर्णव्यवस्था ही जन्मावर आधारित असू नये तर ती गुण व कर्तृत्वावर आधरित असावी. ब्राह्मण व्यवस्थेने केलेल्या वर्ण व्यवस्थेला विचारधारेला शाहू महाराजांनी कडाडून विरोध केला. स्वातंत्र्य पूर्व काळात आपल्या संस्थानात ५०% नोकऱ्यांनमध्ये आरक्षण ठेवणारे शाहू महाराज हे देशातील ७०० संस्थानिकामध्ये एकमेव राजे होते. जातीवर आधारित नोकरी देऊन सुद्धा नोकरीमध्ये बढती देण्यासाठी गुणवत्ता ही सिद्ध करावीच लागेल, असे स्पष्ट सांगणारा पहिला दृष्टा राजा होता. मानवाची बुद्धिमत्ता व मानसिक सामर्थ व त्याची क्षमता याचा जातीशी काडीमात्र सबंध नसतो, असा वैचारिक व वैज्ञानिक दृष्टीकोन शाहू महाराजांनी स्वीकारला.

छत्रपती शाहू महाराजांच्या जीवनात घडून आलेले वेदोक्त प्रकरण हे राजांसह देशातील बहुजनांच्या आर्थिक, सामाजिक, राजकीय जडणघडणीच्या दुष्टीने महत्त्वाचे पाऊल उचलले. या वेदोक्त प्रकरणाने हजारो वर्ष गुलामगिरीत असलेल्या समाजाला आत्मसन्मान व अभिमान प्राप्त करून दिला. कर्मठ अहंकारी, स्वार्थी वर्णवादी वृत्तीच्या लोकांच्या विरोधात माणुसकी व मानवतेचा दृष्टीकोन पुढे ठेवून विज्ञानवादी, सत्यवादी, सत्यशोधक चळवळीची वाटचाल छ. शाहू महाराजांच्या मार्गदर्शनाने गतिमान झाली. बहुजनांना सर्वांगीण गुलामगिरीतून मुक्त करण्यासाठी महात्मा फुल्यांनी सुरु केलेल्या लढ्याचे नेतृत्व शाहू महाराजांनी केले. त्यांच्या प्रयत्नामुळे ब्राह्मणेतर चळवळ गतिमान होऊन बहुजनाच्या विकासाची दारे खुली झाली आहेत. यामध्ये वेदोक्त प्रकरण माहित करून घेणे, वेदोक्त प्रकरणाच्या निमित्ताने निर्माण झालेल्या ब्राह्मण व ब्राह्मणेतरचळवळीचा मागोवा घेणे, वेदोक्त प्रकरणात समर्थक व विरोधक व्यक्ती व चळवळीची माहिती घेणे हा या शोधनिबंधाचा उद्देश आहे. प्राथमिक व दुय्यम साधनाचा संशोधनासाठी वापर केला आहे.

**वेदोक्त प्रकरणाची पार्श्वभूमी:**

वेदोक्त प्रकरणाचे मूळ हिंदुच्या वर्ण व्यवस्थेत पहायला मिळते. हिंदू धर्मामध्ये आर्य व अनार्य या दोन गटात समाजाचे विभाजन झाले होते. आर्य हे स्वत: श्रेष्ठ व उच्च मानत होते, वेदपटनाचाअधिकार केवळ आपलाच आहे असे त्यांचे म्हणणे होते. धार्मिक संस्कारात वेदातील मंत्राना अत्यंत महत्त्व आहे म्हणून आर्याचे सर्वधर्म संस्कार वेदोक्त मंत्र उच्चारण्याने पूर्ण होतात. यालाच वेदोक्त पद्धती असे म्हणतात. आर्यामध्ये ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य असे तीन वर्ण मानले जातात. या तीनही वर्णांना वेदाचा अधिकार होता . परंतु अनार्याना (शूद्रांना) वेदोक्त पद्धतीने विधी करता येत नव्हता. शुद्र हे आर्यापेक्षा कनिष्ठ असल्यामुले त्यांचा धार्मिक विधी पुराणोक्त पद्धतीने (मंत्रांच्या) मदतीने पार पडले जात होते. राज्य सत्तेचे रक्षण करणारे क्षत्रिय लोक व केवळ सत्तेचा उपयोग घेणारी उच्च्तेचा व वर्ण व्यवस्थेचा टेंभा मिरवणारी विषमतेचे, जातीयतेचा स्वीकार करणारी ब्राह्मण जमात यांच्यात संघर्ष सुरु झाला. हा संघर्ष उघडपणे करणे ब्राम्हणांना शक्य होत नव्हते. त्यामुळे धर्मग्रंथाच्या आडून जाती व वर्ण व्यवस्थेच्या आडून अनेक दंतकथा निर्माण केल्या. बहुजनांना शिक्षण नाकारल. आम्हीच देवाचे बाप आहोत. आमची सेवा हेच तुमचे ध्येय असे समजामध्ये भासवण्याचा प्रयत्न केला. परिणामी या समाजाने गुलामगिरीला चालना दिली. उच्चवर्णीय ब्राह्मण कष्ट न करता आरामात जगू लागले. तर बहुजन समाजातील लोकांना अहोरात्र कष्ट करून दु:खात जगावे लागले व हे सर्व ईश्वराच्या इच्छेने होत असल्याचे भासवले जात होते.

**वेदोक्त प्रकरणाचा वाद :**

कार्तिक महिन्याच्या थंडीमध्ये इ.स. १८९९ मध्ये छ. शाहू महाराज पवित्र स्थानासाठी पहाटेच पंचगंगा नदीवर गेले. पवित्रधार्मिक स्नानाच्या वेळी मंत्र पठण करण्यासाठी महाराजांचा पुरोहित नारायण भट्टसोबत होते. कडाक्याच्या थंडीत पाण्यात उडी घेतली. त्यांचा पुरोहित मात्र अंगावर कोट शाली, पायात मोजे, डोक्याला पागोटे शिवाय पायात जोड घालून न आंघोळ करताच मंत्र पठण करीत होता. तेव्हा महाराजांच्या सोबत त्यांचे मेहुणे मामासाहेब खानविलकर होते. बंडखोर समाज सुधारक प्रख्यात पंडित रामशास्त्री भागवत, शाहू महाराजांचे बंधू बापूसाहेब असे अनेक लोक सोबत होते. तेव्हा रामशास्त्री यांच्या लक्षात आले की नारायण भट्ट छ. शाहू महाराजांसाठी वेदातील मंत्र पठण न करता पुराणोक्त मंत्र पठण करत होते. ही बाब त्यांनी शाहू महाराजांच्या लक्षात आणून दिली. स्नान करून महाराज नारायण भट्टजवळ गेले व त्यांना विचारले आता तुम्ही कोणते मंत्र पठण करत होता? वेदोक्त की पुराणोक्त? तेव्हा नारायण भट्ट म्हणाले आम्ही शूद्रासाठी पुराणोक्त मंत्र पठण करतो.

जोपर्यंत सर्व शक्तिमान ब्राह्मण वर्ग तुम्हाला क्षत्रिय म्हणून मान्यता देत नाही. तोपर्यंत तुम्ही क्षत्रिय समजत असला तरीही तुम्ही शुद्र मानले जाणार आहात. नारायण भटाचे बोलणे ऐकून महाराजांचा राग अनावर झाला. मात्र धैर्य व संयम, ठेवून झालेला अपमान सहन केला. मात्र नंतर मनामध्ये ब्राह्मणनी सत्तेचा अंत व समाजक्रांतीचे बीजारोपण करण्याची भीष्म प्रतिज्ञा घेतली. महाराजांचे पुरोहित या सर्व घडलेल्या प्रसंगापासून महाराजांकडे जाण्याचे टाळू लागले. विविध मार्गांने मराठा हे क्षत्रिय नसून शुद्र आहेत. त्यांना वेदोक्ताचा अधिकार नाही असे सर्वत्र सांगत सुटले.

याच काळात नारायण शास्त्रीय सेवेकरी यांनी मात्र मराठ्यांचे वेदोक्त पद्धतीने धार्मिक विधी केले. ऋग्वेदातील मंत्र पठण केले. तेव्हा नारायण भट व इतर ब्राहमणांनी नारायण सेवेकरी यांच्यावर बहिष्कार टाकला. त्यांना बहिष्कृत केले. महालक्ष्मी मंदिरात प्रवेश नाकारला. दसऱ्याच्या दिवशी शाहू महाराजांनी दिलेले भोजनाचे निमंत्रण नाकारले. या काळात मराठ्यांना वेदोक्ताचा अधिकार नाही असे सांगण्याचा प्रयत्न प्रा. विजापूरकरांनी केला. त्यांनी नारायण भटाची बाजू घेतली.

लोकमान्य टिळकांपासून ते अनेक पत्रकारांपर्यंत विविध क्षेत्रातील ब्राह्मणांनी नारायण भटांची बाजू घेऊन छत्रपतींना वेदोक्ताचा अधिकार नसल्याचे सांगितले. मात्र छ. शाहू महाराजांनी आपण नारायण भट समजतो त्याप्रमाणे आपण शुद्र नसून क्षत्रिय आहोत. आणि त्यामुळे आपल्या घरातील धार्मिक कृत्ये आणि संस्कार वेदोक्त पद्धतीने व्हावयास पाहिजेत, असा शाहू महाराजांनी आग्रह धरला. जे भट ब्राह्मण वेदोक्त मंत्र म्हणून छत्रपतींच्या घरातील धार्मिक विधी करण्यास नकार देत होते. त्यांच्या नेमणुका रद्द करून, वतने काढून घेण्याचा शाहू महाराजांनी धडाका लावला. या सर्व प्रकरणास वेदोक्ताचा वाद अगर वेदोक्त प्रकरण म्हटले गेले.

**वेदोक्त प्रकरण व शाहू महाराजांचा सामाजिक न्यायाचा लढा**

छ. शाहू महारजांनी हे प्रकरण अतिशय शांतपणे व संयमाने हाताळण्याचा प्रयत्न केला. मात्र ब्राह्मणांनी संघटना विचारवंत व नेत्यांच्या उद्दामपणामुळे महाराजांना आक्रमक होणे भाग पडले. इ.स. १९०१ मध्ये राजवाड्यातील नवरात्र उत्सवातील सर्व पूज्य विधी वेदोक्त पद्धतीने करावे असे सांगितले. तेव्हा नारायण भटाने राजांची आज्जी राणीसाहेबांना राजांच्या विरोधात भडकावणेचा प्रयत्न झाला. त्यावेळी राजश्री शाहू महाराजांनी उदयपुर, सातारा व बडोद्याच्या महाराजांना सोबत घेऊन राणी साहेबांना आपली भूमिका पटवून दिली.

वेदोक्त पद्धतीचा अभ्यास करण्यासाठी शाहू महारांजानी रावबहादुर, कृष्णाजी नारायण, पंडित सरन्यायाधीश विश्वनाथ गोखले यांचे नेतृत्वाखाली त्रिसदस्यीय समिती नेमून आपला वेदोक्ताचा अधिकार आहे, यासाठी जमा केली. या समितीने पाच महिने माहितीचे संकलन करून चिंतन करून १६ एप्रिल १९०२ मध्ये शाहू महाराजांना वेदोक्ताचा अधिकार नसल्याचे जाहीर केले. या समितीचा सदस्य असलेला नारायण भटाचे मात्र इतर सदस्यांनी दिलेला वेदोक्ताचा अधिकार नाकारला. अशा प्रकारे जातीयवादी व ब्राह्मणी वर्चस्व असलेल्या नारायण भटाने शेवटपर्यंत महारजांना विरोध केला होता. कोल्हापुरातील नारायण भट व इतर ब्राह्मणांनी वेदोक्त प्रकरणाला गव्हर्नर साहेबाकडे आव्हान दिले.

देशातील विविध पिठाच्या शंकराचार्यांनी शाहू महाराजांचा वेदोक्ताचा अधिकार मान्य करू नये असे सागितले. हा सर्व प्रकार झाल्यानंतर शाहू महाराजांची सहनशीलता संपली. त्यांनी भटांची वतनदारी संपविली. दरमहा ३० हजाराचे वेतन बंद केले. फौजदारी व महसूल विषयक अधिकार काढून घेतले. लोकमान्य टिळकांनी तेव्हा नारायण भटाची बाजू घेऊन शाहू महाराजांच्यावर प्रखर टिका केली. तत्कालीन अनेक ब्राह्मण विचारवंत व धर्मवेड्या ब्राह्मणांनी क्षत्रिय केव्हाच नष्ट झाल्याचे म्हटले. म्हणून शाहू महाराजांना वेदोक्ताचा अधिकार नाही असे म्हटले. यापुढे जाऊन नारायण भटाने ब्रिटिश पार्लमेंटकडे अर्ज करून शाहू महारजांना वेदोक्ताचा अधिकार नाकारावा अशी विनंती केली होती.

मुंबईचा गव्हर्नर व ब्रिटिश सरकारने वेदोक्त प्रकरणाचा प्रदीर्घकाळ अभ्यास करून शाहू महारजांना वेदोक्ताचा अधिकार असल्याचे एकमताने मान्य केले. ९ मे १९०९ रोजी लॉर्ड कर्झन स्टे (स्थगितीचे) परिपत्रक काढले. शेवटी १० जुलै १९०५ मध्ये विद्या नरसिंह भारती शंकराचार्य यांनी कागदपत्र तपासून शाहू महारजांना वेदोक्ताचा अधिकार असल्याचे आदेश काढले. परिणामी २५ डिसेंबर १८०५ मध्ये कोल्हापुरातील ब्राह्मण सभेची बैठक होऊन शाहू महाराजांचा वेदोक्ताचा अधिकार मान्य केला होता. अशा प्रकारे प्रदीर्घ काळ चाललेल्या धार्मिक व सांस्कृतिक संघर्षात शाहू महाराजांचा विजय झाला. छ. शाहू महाराजांचे यामुळे क्षत्रियत्व सिद्ध झाले. उच्चवर्णीयांची धार्मिक जुलमशाही व मक्तेदारी मोडून काढण्यासाठी छात्र जगत गुरु पिठाची स्थापना केली. दिन-दलित, शोषित, पंडित बहुजनांना धार्मिक व सांस्कृतिक गुलामगिरीतून मुक्त केले.

**समारोप**

वेदोक्ताच्या मंत्रांनी आपला उद्धार होणार नाही. याची शाहू महाराजांना जाणीव होती. पण हा वेदोक्त मंत्राचा प्रश्न नव्हता. हा सामाजिक हक्काचा प्रश्न होता. हिंदू धर्मातील क्षत्रिय वर्णाचा एक मुलभूत हक्क होता. म्हणून मराठ्यांना वेदोक्ताचा अधिकार हवा होता. ब्राह्मणांनी आपल्या बरोबरीच्या क्षत्रियांचे 'क्षत्रियत्व' च नाकारून त्यांचे अस्तित्व पुसले होते. आणि त्यांना शुद्रात बसविले होते. यामागे ब्राह्मणांचा वर्णश्रेष्ठत्वाचा अहंकार होता. सर्व ब्राह्मणेत्तरांना तुच्छ लेखण्याची गर्विष्ठ वृत्ती होती. समाजात आपल्याच वर्गाची सर्वंकष मक्तेदारी निर्माण करण्याचे कुटील कारस्थान होते. या सर्वाना मराठ्यांचे क्षत्रियत्व मान्य करून त्यास वेदाधिकार दिल्याने शह बसणार होता. धर्मकारणातच नव्हे तर सर्व समाजकारणातही ब्राह्मणांच्या बरोबर ब्राह्मणेत्तरांनासुद्धा प्रतिष्ठा प्राप्त होणार होती. वेदोक्त प्रकरणामुळे ब्राह्मणी मनुवादी मूर्तीचे दर्शन घडले. छ. शाहू महाराजांच्या बाब्तीर कर्मठ वागणारे ब्राह्मणी विचारवंत गोरगरीब जनतेसोबत कसे वागत असतील याचे ज्ञान झाले. छ. शाहू महाराजांच्या काळातही काही ब्राह्मण मंडळी उदारमतवादी व मानवतावादी वृत्तीचे असल्याचे स्पष्ट झाले.

**संदर्भ**

१) डॉ. पवार जयसिंगराव, 'राजर्षी शाहू छत्रपती जीवन व कार्य', महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी कोल्हापूर- २०१२

२) डॉ. पवार जयसिंगराव,'राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ', महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी कोल्हापूर- २००१.

३) (सं.) साळुंखे पी.बी., 'राजर्षी शाहू गौरव ग्रंथ', मुंबई,१९७६.

४) कीर धनंजय, 'राजर्षी शाहू छत्रपती', एक समाजक्रांतिकारक राजा', मुंबई, १९७९.

५) जाधव रमेश, 'राजर्षी श्रीशाहू छत्रपती: वाद आणि वास्तव', कोल्हापूर- १९९२.

६) फडके य.दि. 'विसाव्या शतकातील महाराष्ट्र खंड -१', पुणे १९८९.

७) भगत रा.नू., 'राजर्षी शाहू महाराज'

८) पानसरे गोविंद, 'राजर्षी शाहू वसा आणि वारसा'

९) लोकमान्य मासिक, सप्टेंबर २०१८.

१०) दैनिक पुढारी, १४ एप्रिल २०१६.

११) www.wikipedia.com